RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २६

दि. १५ मे २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## प्रा.डॉ.बालाजी शिंदे यांना भारत सरकारकडून कॉपीराईट मंजूर

**लातूर/प्रतिनिधी** :येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील मराठी विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. बालाजी शिंदे यांनी भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाकडे 'मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती' या विषयावरील कलाकृतीचे सादरीकरण केले होते. त्यांच्या या नावीन्यपूर्ण सृजनशील कलाकृतीसाठी भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाकडून कॉपीराईट मंजूर करण्यात आले व अधिकृत कॉपीराईट प्रमाणपत्र त्यांना प्रदान करण्यात आले आहे. हे त्यांचे कार्य त्यांच्या साहित्यिक प्रतिभेची, संशोधननिष्ठेची आणि मराठी भाषा - संस्कृतीप्रती असलेल्या समर्पणाची गौरवशाली पावती आहे.डॉ.बालाजी शिंदे व यादव मोरे यांनी केलेले संशोधन मराठी भाषा शिकण्यासाठी व संवादाच्या सुलभतेसाठी उपयुक्त ठरणार आहे.



या त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ.राम बोरगावकर, प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे, प्रा.डॉ. वसंत बंडे, प्रा. रवि चव्हाण, डॉ. सुदाम पवार, प्रा. तुकाराम येमले, प्रा.श्रीमंत दोरवे, श्री.शशिकांत सोळुंके, डॉ. संतोष कुलकर्णी, प्रा. अमोल जाधव, डॉ. मोनालिसा खानोरकर, श्री.कोंडीराम कागले यांनी त्यांच्या या नाविन्यपूर्ण संशोधनाचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत १९ मे रोजी जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे लातूर जिल्हा कार्यालय, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातंग समाजातील १२ पोटजातींमधील बांधवांसाठी १९ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातील शासकीय मुलांचे वसतिगृह अभ्यासिका हॉल होणार आहे.अनुसूचित जाती प्रवर्गातील मातंग समाजाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचावी आणि जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, या उद्देशाने या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत समाज कल्याण विभाग आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध वैयक्तिक आणि सामूहिक लाभ योजनांची सविस्तर माहिती दिली जाईल. तसेच महामंडळामार्फत मिळणारे कर्ज, शैक्षणिक सवलती आणि रोजगाराच्या संधींबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मातंग समाजातील युवक-युवती आणि गरजू लाभार्थ्यांनी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांची माहिती घ्यावी, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदासाठी तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १५ जून, २०२६ ते २८ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १४ जून, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे.

या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत. लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी ९ जून, २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे मुलाखतीसाठी हजर रहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून) सीडीएस-६७ कोर्सचे प्रवेशपत्र आणि त्यासोबत असलेल्या परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याने लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. यासोबतच संबंधित पात्रता प्रमाणपत्रही आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी ईमेल (training.pctcnashik@gmail.com), दूरध्वनी (०२५३-२४५१०३२) किंवा व्हॉट्सॲप (९१५६०७३३०६) द्वारे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

# महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची गुंतवणूक; ८,००० जणांना मिळणार रोजगार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग आणि एएम इंटेलिजन्स लॅब यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार आज झाला.

मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात



तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात (चचठ) 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल. प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

हा प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असून यामध्ये २,५०,००० उच्च क्षमतेचे 'एआय चिपसेट्स' वापरले जातील. तसेच या प्रकल्पाचा दोन टप्प्यांत विकास करण्यात येईल. २०० मेगावॅट क्षमतेचा पहिला टप्पा सन २०२८ पर्यंत तर ३०० मेगावॅट क्षमतेचा दुसरा टप्पा २०३० पर्यंत पूर्ण करण्यात येणार उद्दिष्ट आहे.

हा प्रकल्प राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ तसेच हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क धोरण २०२४ अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात राष्ट्रीय व जागतिक स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा उद्देश या प्रकल्पामागे आहे.

## दिल्ली हादरली! स्लीपर बसमध्ये विवाहित महिलेवर बलात्कार

दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर चर्चेत आली आहे. राजधानीत एका खासगी स्लीपर बसमध्ये विवाहित महिलेवर बलात्कार झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी बसच्या ड्रायव्हर आणि कंडक्टरवर बलात्काराचा आरोप करण्यात आला असून पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. ही घटना १२ मे रोजी घडल्याची माहिती समोर आली आहे. महिला सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात असतानाही आरोपींमध्ये कायद्याची भीती नसल्याचं या घटनेतून पुन्हा स्पष्ट झालं आहे.

पीडित महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली. ज्या स्लीपर बसमध्ये हा प्रकार घडला, ती बस पोलिसांनी जप्त केली असून पुढील तपास सुरू आहे. पीडित महिला विवाहित असून तिला तीन मुलं असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. पोलिसांनी तिचा जबाब नोंदवून घेतला असून वैद्यकीय तपासणीनंतर इघ्ठ दाखल करण्यात आला.

हा गुन्हा बसच्या आतमध्ये घडल्याचं तपासातून सम ोर आलं आहे. संबंधित महिला या बसमधून प्रवास करत होती, अशी माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली. मात्र हा प्रकार नेमक्या कोणत्या परिस्थितीत घडला आणि बसचा मार्ग काय होता, याबाबत पोलिसांनी अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही.

सध्या बसचा ड्रायव्हर आणि कंडक्टर पोलिसांच्या ताब्यात असून त्यांची चौकशी सुरू आहे. बसमधून गोळा करण्यात आलेल्या पुराव्यांची तपासणी केली जात आहे. या प्रकरणात फॉरेन्सिक आणि मेडिकल रिपोर्ट महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचं सांगितलं जात आहे. तपास अधिकारी मजबूत केस तयार करण्यासाठी आणखी पुरावे गोळा करत असून संपूर्ण घटनाक्रमाची जुळवाजुळव केली जात आहे.घटना घडली त्यावेळी बस सुरू होती का? त्या वेळी बसमध्ये इतर प्रवासी उपस्थित होते का? अशा अनेक मुद्द्यांवर दिल्ली पोलीस तपास करत आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून पुढील चौकशीत आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, पोलिसांनी अद्याप आरोपींची ओळख जाहीर केलेली नाही.

## विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी विधान परिषदेच्या नवनिर्वाचित १० सदस्यांना दिली शपथ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडून आलेल्या सर्व सदस्यांना विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ दिली.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोड, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई ,आमदार रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

आज डॉ. नीलम गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशान झिआउद्दीन सिध्दीकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे आणि संजय नथ्थुजी भेंडे या १० सदस्यांनी शपथ घेतली.

विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात हा शपथविधीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सभापती प्रा . राम शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित विधानपरिषद सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## संजय गांधी निराधार योजना समिती गठीत

### रेणापूरच्या अध्यक्षपदी सतीश आंबेकर तर लातूरच्या अध्यक्षपदी बन्सी भिसे यांची नियुक्ती

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुका आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार गठित करण्यात आली असून रेणापूर तालुका समितीचे अध्यक्षपदी सतीश आंबेकर यांची तर लातूर तालुका समिती अध्यक्षपदी बन्सी भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रेणापूर तालुका आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार गठीत करण्यात आली असून याबाबत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार दोन्ही तालुका समितीच्या अध्यक्ष आणि सदस्यांना





नियुक्ती पत्र दिले आहे.

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी सतीष रावसाहेब आंबेकर रा. नरवटवाडी यांची तर सदस्यपदी ललीता अरुण कांबळे रा. पानगाव, कस्तुराबाई आत्माराम माने रा. चाडगाव, विठ्ठल काशीनाथ कसपटे रा. निवाडा, संजय लक्ष्मण चव्हाण रा. हरिओम नगर, रेणापूर, गोविंदराव नानासाहेब देशमुख रा. डि. देशमुख, सदानंद केदारनाथ पिंपळे रा. खरोळा, विरेंद्रसिंह गोविंदसिंह चौहान रा. पानगाव, सतिश उध्दराव जाधव रा. बिटरगाव, सुरेश रामराव बुड्डे रा. आनंदवाडी यांचा समावेश करण्यात आला आहे.

लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी बन्सी भगवानराव भिसे रा. सारसा यांची तर सदस्यपदी परमेश्वर माधवराव पर्वते रा. शिवणी, स्वाती किशोर घुटे रा. एकुरगा, संतोष नारायण गायकवाड रा. सलगरा बु., अंकुश हरिभाऊ कुंभार रा. मुरुड, विनायक मल्हारी मगर रा. रामेगाव, सदाम रशीद शेख रा. मुरुड, सदाशिव सोपान गव्हाने रा. सलगरा, रुपेश सुर्यकांत काळे रा. भातखेडा, बाबासाहेब साहेबराव भिसे रा. गाधवड समितीत यांचा समावेश करण्यात आला आहे.

रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्ष आणि सदस्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## लातूर जिल्ह्यात मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम

### २०.३६ लाख मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

**लातूर/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून या मोहिमेंतर्गत लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

**बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी**

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या तपशिलाची खातरजमा २ हजार १४२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी




जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले बूथ लेव्हल एजंट्स (बीएलए) त्यांना सहकार्य करणार आहेत.

**जनगणनेच्या कामाशी सांगड**

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

**लातूर जिल्ह्यासाठी महत्त्वाचे वेळापत्रक**

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

**राजकीय पक्षांना आवाहन**

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (बीएलए) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

### लातूर जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रनिहाय मतदार संख्या

| | |
|---|---|
| लातूर ग्रामीण- ३३२०११ | लातूर शहर- ३९९१०५ |
| अहमदपूर- ३४५३६० | उदगीर (अ.जा.)- ३२३५६५ |
| निलंगा- ३३३३९१ | औसा- ३०३२०९ |

संपादकीय...

## विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या

जगातील सर्वात तरुण देश अशी भारताची ओळख. आपल्या देशातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ६५ टक्के लोकसंख्येचे वय ३५ वर्षांपेक्षा कमी तर देशाचे सरासरी वय केवळ २९ वर्षे इतके आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, क्रीडा, उद्योग क्षेत्रांसह अनेकानेक विषयांवर भारतीय तरुणांनी आपले वर्चस्व वेळोवेळी निर्विवाद सिद्ध केले. एकीकडे जागतिक स्तरावर ही अभिमानास्पद बाब असली, तरी दुसरीकडे देशांतर्गत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये सातत्याने होणारी वाढ ही सामाजिक चिंता वाढविणारी आहे. नुकताच राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाने 'अपघाती मृत्यू आणि आत्महत्या-२०२४' हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे वाढत असलेले प्रमाण चिंताजनक म्हणावे लागेल. राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाच्या आकडेवारीनुसार देशात २०२० साली १२ हजार ५५६ इतक्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. देशात झालेल्या एकूण आत्महत्यांच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची टक्केवारी ८.२ इतकी होती. २०२१ साली १३ हजार ८९, २०२२ साली १३ हजार ४४, २०२३ साली १३ हजार ८९२ तर २०२४ साली १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद या अहवालात आहे. २०२४ साली एकूण आत्महत्येच्या तुलनेत ८.५ टक्के इतक्या आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. ही आकडेवारी निश्र्चितच दुर्दैवी म्हणावी लागेल. त्यातही विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची सर्वाधिक १९०९ घटना महाराष्ट्रात झाल्याचे या अहवालातील आकडेवारीवरून दिसून येते. महाराष्ट्राखालोखाल उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू यांचा क्रम लागतो. विद्यार्थी आत्महत्यांपैकी जवळपास ४३ टक्के आत्महत्या या ४ राज्यात घडल्याचे दिसून येते. नुकताच दहावीचा निकाल लागला. या निकालात बहुतांश विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले तर काहींना अपेक्षित यश गाठता आले नाही. अकोला जिल्ह्यातील एका घटनेमुळे आता यशाची व्याख्या देखील कळेनाशी झाली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिकणा्या एका विद्यार्थ्याला ६७ टक्के मिळाले. खरं म्हणजे ही टक्केवारी प्रथम श्रेणीची पण या विद्यार्थ्याने निकालानंतर एका जलाशयात उडी मारून आत्महत्या केली. मोबाईलवरील स्टेटसमुळे त्याला अपेक्षित यश न मिळाल्याने त्याने आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे पुन्हा एकदा यश-अपयश, ज्ञान प्राप्ती- शिक्षण या सर्व बाबीचे समीक्षण आणि विद्यार्थ्यांचे समुदेशन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. शिक्षण हे आता ज्ञानप्राप्तीचे साधन राहिले नसून ते आता स्पर्धेचा आखाडा झाल्याचे चित्र आहे. शिक्षण व्यवस्था ही पोटार्थी होत असल्याचे दिसून येते. अगदी शिशू अवस्थेपासून शाळा (कॉन्व्हेंट), शिकवणी, एक्स्ट्रा क्लास, विशेष वर्ग (अदर ॲक्टिव्हिटी) या चक्रात विद्यार्थी अडकतो अन् मग स्वयं अध्ययन, आवडीचे विषय, खेळ आदी बाबी त्याच्या आयुष्यातून बाद होतात. मग उरते ती केवळ मार्क आणि टक्केवारीची स्पर्धा. या दृष्टचक्रात अडकल्यामुळे, सतत वाढत असलेल्या दबावामुळे विद्यार्थी आत्महत्येसारखी समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर येत आहे. वास्तविक इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, वाङ्मय अशा क्षेत्रातही उत्तम ज्ञान, संधी आहेत. देशाच्या विकासात प्राध्यापक, संशोधक, तज्ज्ञ आदींनी या विषयाद्वारे महत्त्वपूर्ण भूमिका वठविली आहे. या विषयासह विविध विषयांचे ज्ञान असणाऱ्यांची गरज भविष्यातही आहेच. पण दुर्दैवाने पालक आणि विद्यार्थी केवळ स्पर्धा परीक्षा, इंजिनीअरिंग, वैद्यकीय क्षेत्र यालाच भविष्य समजू लागले. यातच जीवनाचे सार्थक आहे. या कल्पनेच्या बाहेर विद्यार्थी जाऊ शकत नसल्याने विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था विचित्र होत आहे. गत काही वर्षांत समाजमाध्यमांचा प्रभाव सतत वाढतो आहे. इन्स्टाग्राम, यूट्यूब, फेसबुक यावर इतरांचे यश, आलिशान जीवन, परदेशी शिक्षण, उच्च पगार यांचे आकर्षक चित्र दिसते. त्यामुळे अनेकदा स्वतःतील न्यूनगंड वाढतो. 'मी मागे पडतोय' ही भावना मानसिक तणाव वाढवते. वास्तविक एका परीक्षेतील अपयश म्हणजे आयुष्याचा शेवट हा कधीच असू शकत नाही. पण दुर्दैवी घटनांमध्ये सतत होणारी वाढ ही भयावह आहे. आत्महत्येचा विचार सुरू असणाऱ्याच्या मनात प्रचंड द्वंद्व सुरू असतं, आत्महत्येचा विचार केवळ निकोप संवादातून दूर सारला जाऊ शकतो, असेही असे तज्ज्ञांचे मत आहे. खरं म्हणजे मनमोकळा संवाद हा भारतीय कुटुंब व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. दुर्दैवाने गत काही वर्षात कुटुंबातील संवाद कमी होत असल्याचे दिसून येते. याची अनेकानेक कारणे असली तरी कुटुंबातील निकोप संवाद वाढणे, अधिक दृढ होणे हे विद्यार्थी आत्महत्येसह विविध समस्यांच्या निराकरणासाठी आवश्यक आहे.

# मंत्रिमंडळ निर्णय




पाटबंधारेच्या सहा प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ काढण्यात येणार

शेतकऱ्यांना मोफत गाळ; सीसीटिव्ही, जीपीएस- जीओ फेन्सिंगद्वारे नियंत्रण

राज्यातील धरणांच्या जलाशयांतील वाढता गाळ, कमी होत चाललेला पाणीसाठा क्षमता आणि अनियंत्रित वाळू उपशाच्या पार्श्वभूमीवर सहा मोठ्या प्रकल्पांच्या जलाशयातून प्रायोगिक तत्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यास व त्याबाबतच्या सुधारित धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या धोरणामुळे प्रकल्पांतील पाणीसाठा वाढणार असून, शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. तसेच धरणांच्या जतन संवर्धनाच्या दृष्टीने हे पाऊल महत्वाचे ठरणार आहे. प्रायोगिक तत्वावर गाळ काढण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये उजनी, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी आणि हतनूर धरण या प्रकल्पांचा समावेश आहे.

नव्या धोरणानुसार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांना ही कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या प्रक्रियेतून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व दुरुस्ती कामांसाठी वापरला जाणार आहे.

या निर्णयातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे धरणांमधून काढण्यात येणारा गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात टाकण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी फक्त वाहतूक खर्च करायचा असून कोणतेही स्वामित्व शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे.

गाळाच्या परिमाणानुसार निविदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ५० दशलक्ष घनमीटरपर्यंत गाळ असल्यास ५ वर्षे, ५० ते १०० दशलक्ष घनमीटरसाठी ७ वर्षे आणि १०० दशलक्ष घनमीटरपेक्षा अधिक गाळ असल्यास १० वर्षांचा कालावधी असेल.

नव्या धोरणात वाळू चोरी आणि अनियमितता रोखण्यासाठी कडक तांत्रिक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गाळमिश्रित वाळूपासून वेगळी करण्यात आलेली वाळू साठवणूक क्षेत्र जीओ फेन्सिंग अंतर्गत राहणार असून तेथे २४७ सीसीटीव्ही देखरेख बंधनकारक असेल. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक राहील. वाहनांचे ई-पास, बारकोड प्रणाली आणि ऑनलाईन नोंदी ठेवण्याची सक्ती करण्यात आली आहे.

जलाशयातून केवळ वाळू उपसा करता येणार नाही. गाळ आणि वाळू दोन्ही काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच नैसर्गिक जमिनीच्या पातळीखाली दोन फुटांपेक्षा अधिक उत्खनन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

पर्यावरणीय बाबींनाही या धोरणात महत्त्व देण्यात आले आहे. पर्यावरण विभागाची परवानगी, राज्य तज्ञ मूल्यमापन समिती आणि राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची मान्यता, तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ''सस्टेनेबल सँड मायनिंग मॅनेजमेंट गाईडलाईन्स २०१६'' आणि ''एन्फोर्समेंट अँड मॉनिटरिंग फॉर सँन्ड मायनिंग २०२०'' मधील निकषांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

जलाशयांच्या पृष्ठभागावर भविष्यात सौरऊर्जा प्रकल्प, पर्यटन, जलक्रीडा किंवा जलविद्युत प्रकल्प उभारण्यास अडथळा निर्माण होणार नाही, अशी अटही करारामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील धरणांची पाणीसाठवण क्षमता वाढणे, सिंचन कार्यक्षमता सुधारणे, शेतजमिनींची सुपीकता वाढणे आणि वाळू उत्खनन प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे.

०००

नाशिक जिल्ह्यातील अंबोली-वेळुंजे वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाखाची तरतुद

नाशिक जिल्ह्यातील अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रकल्पामुळे १६५ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण य़ोजना दमणगंगा खोऱ्यातील वाल नदीच्या नाल्यावर प्रस्तावित आहे. या योजनेव्दारे पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी पूर्व वाहिनी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. या योजनेद्वारे ३२.०४ दशलक्ष घन फूट पाणी उपलब्ध होणार आहे. यापैकी ४.८३ दशलक्ष घ. फू. पाणी साठा स्थानिक वापरासाठी तर २७.२१ द.ल.घ. फू. पाणी साठा गोदावरी खोऱ्यात प्रवाही पध्दतीने वळविण्याचे नियोजन आहे. ४९.२६ कोटी पैकी ४६ कोटी रुपये प्रत्यक्ष कामासाठी तर ३.२६ कोटी रुपये अनुषांगिक कामासाठी मंजूर करण्यात आले आहेत.

प्रकल्पास युनिक पायाभूत आयडी देण्याची कार्यवाही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने करावयाची आहे. कामास दिलेल्या मान्यतेपैकी भूसंपादनासाठी १३.४६ कोटी, कामांसाठी २४.३३ कोटी, पुलासाठी ३.९० कोटी, इमारतीसाठी ३२ लाख, दळणवळणासाठी ३.७० कोटी, वृक्षारोपणासाठी १५ लाख, देखभालीसाठी १२ लाख आणि संकीर्ण १.७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

०००

सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यांसाठी आणखी तीन वर्षांसाठी 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.०' राबविणार

सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील नैसर्गिक साधनसंपत्तीचे परिणामकारक नियोजन करून दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी 'सिंधुरत्न समृध्द योजना २.०' आणखी तीन वर्षासाठी २०२८-२९ पर्यंत राबविण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. योजना कालावधीत दोन्ही जिल्ह्यांसाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात ही योजना पुढील तीन वर्षासाठी प्रस्तावित करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार २०२८-२९ पर्यंत ही योजना राबविण्यात येणार आहे. दोन्ही जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि समुद्र किनारा यांच्या वापरातून पर्यटन आणि मत्स्यव्यवसायास चालना देऊन रोजगार निर्मिती करणे आणि दरडोई उत्पन्नात वाढ करण्याचे नियोजन आहे.

या योजनेतून बंदर धक्का आणि पर्यटन नौका केंद्राच्या ठिकाणी मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आणि जलक्रीडाकरिता पायाभूत सुविधा करणे, पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मुलभूत व्यवस्था निर्माण करणे, अविकसित बँक वॉटरच्या परिसरात जलक्रीड़ा प्रकारांना चालना देण्यासाठी मुलभूत सुविधा विकास करणे, कॅराव्हॅन कॅम्पिंग सुविधा आणि मार्गावर पायाभूत सुविधा विकास करणे, मासळी उतरविण्याचे केंद्र विकसित करणे, मासळी बाजाराकरिता सुविधा करणे, मत्स्य बीज उत्पादन केंद्र, मत्स्य साठवणूक, विक्री केंद्र आणि मत्स्यालय उभारणे आदी कामे करता येणार आहेत.

सिंधुरत्न समृध्द योजनेची अंमलबजावणी दोन भागात करण्यात येणार आहे. सिंधुरत्न समृध्द योजनेच्या २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत प्रशासकीय मान्यता मिळालेल्या परंतु अद्याप अपुरी राहिलेली कामे ३१ मार्च २०२७ पर्यंत पुर्ण करण्यासाठी योजनेच्या भाग-एक अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. योजनेच्या भाग दोनमध्ये दोन्ही जिल्ह्याच्या सर्व कामांना २०२६-२७ या वर्षात प्रशासकीय मान्यता घ्यावी. सर्व कामे २०२६-२७ ते २०२८-२९ या कालावधीतच पूर्ण करायची आहेत.

योजनेचा आराखडा तयार करणे, त्याची कालबध्द अंमलबजावणी करणे यासाठी दोन्ही जिल्ह्यासाठी स्वतंत्र समितीही स्थापन करण्यात येतील. समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल पालकमंत्री-अध्यक्ष, जिल्हाधिकारी-उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी-सदस्य, जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणांचे प्रमुख अधिकारी-सदस्य, जिल्हा नियोजन अधिकारी-सदस्य सचिव. या समितीवर वरील सदस्यांव्यतिरिक्त प्रत्येकी एक विशेष निमंत्रित सदस्य नियुक्त करण्यात येईल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येईल.

०००

स्पर्धा परीक्षेसाठी राखीव प्रवर्गासाठीच्या सवलती घेतल्यास खुल्या जागेवरील दावा अमान्य

स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेस बसण्याची संधी या आधारे सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणाऱ्या उमेदवारांबाबत स्पष्टता निर्माण होणार असून आरक्षणाच्या अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता आणि सुसंगती येणार आहे.

राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) या पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत घेतलेली नाही, अशा उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातूनही करण्यात येणार आहे.

तथापि, ज्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) संधीमध्ये शासनाने दिलेली सवलत घेतलेली असेल, अशा उमेदवारांची गणना संबंधित राखीव प्रवर्गातच करण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नाही, असेही या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे.

०००

विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी लागू

विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यात विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, ऊसतोड व विद्यानिकेतन अशा एकूण ९७७ आश्रमशाळा स्वंयसेवी संस्थामार्फत अनुदान तत्त्वावर चालविल्या जातात. या आश्रमशाळांमधील उच्च माध्यमिक शिक्षकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नसल्याने १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आश्रमशाळांतील ७८८ उच्च माध्यमिक शिक्षकांना ही वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी श्रेणी लागू होणार आहे. हा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही, तसेच यात कोणतीही थकबाकी दिली जाणार नाही, या अटीसह या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

०००

नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानला दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान

नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानला विविध प्रकारच्या वाङ्मयीन उपक्रमांचे आयोजन करण्य़ासाठी यंदाच्या आर्थिक वर्षापासून दहा लाख रुपये निधी देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मराठी साहित्याचा प्रसार आणि संवर्धनासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजी नगर, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या सात संस्थांना दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान देण्यात येते.

या संस्था नियतकालिकांचे प्रकाशन, विभागीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन, मराठी ग्रंथ निर्मितीसाठी विविध पारितोषके देणे, संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन आदी विविध वाङ्मयीन उपक्रमांचे आयोजन करतात. याचप्रमाणे कुसुमाग्रज प्रतिष्ठानकडूनही कार्य केले जाते त्यामुळे कुसुमाग्रज प्रतिष्ठानलाही दरवर्षी दहा लाख रुपये निधी देण्यास मान्यता देण्यात आली.

०००

नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पासाठी जमीन खरेदीवर मुद्रांक शुल्कात सवलत

नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पासाठी आवश्यक ठरेल, अशा खासगी जमिनीच्या खरेदीवरील मुद्रांक शुल्क सवलत देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) मधील आडगाव-दिंडोरी रोड-डकांबळे शिवार-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८-पेठ गवळवाडी-गंगापूर -रोड-गोवर्धन-त्र्यंबक महामार्ग-बेलगाव ढगा-नाशिक मुंबई महामार्ग-विल्होली-सिन्नर फाटा अशा ६६.१५ किलोमीटरच्या आखणीस मान्यता देण्यात आली आहे. परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनासाठी ३ हजार ६५९ कोटी ४७ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. हा खर्च नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

परिक्रमा मार्गाचे भूसंपादन थेट खरेदी पध्दतीने करण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी अंदाजे ७५ कोटी रुपयांचे मुद्रांक आणि नोंदणी शुल्क भरावे लागणार आहे. भूसंपादन प्रक्रिया आणि बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी आरेखनात समाविष्ट जमिनींच्या खरेदी खतासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

०००

मृद व जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजुर;विभागासाठी ८ हजार ७६७ पदांना मान्यता

राज्याच्या मृद व जलसंधारण विभागाच्या फेररचनेसह विभागाकरिता सुमारे ८ हजार ७६७ पदांच्या आकृतीबंधास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

२०१७ मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागातून मृद व जलसंधारण या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली होती. छत्रपती संभाजी नगर येथे आयुक्तालयाच्या स्थापनेसह क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेसाठी सुमारे १६ हजार ४२३ पदाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला होता. यात मूळ विभागाची ६ हजार ४८१ पदे व कृषि विभागाकडून ९ हजार ९४२ पदे वर्ग होणे अपेक्षित होते. यावर उच्चस्तरीय सचिव समितीने मृद व जलसंधारण विभागाकरिता मंजूर ६ हजार ४८१ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरिता मंजूर २ पदांसह एकूण ६ हजार ४८३ पदांव्यतिरिक्त सुमारे २ हजार २८४ वाढीव पदांसह ८ हजार ७६७ पदांच्या सुधारित आकृतीबंधला मान्यता दिली. याशिवाय विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना करण्यास मान्यता देण्यात आली. यात प्रादेशिक जलसंधारण अधिकारी सहा कार्यालयांतील १०२ पदे रद्द करण्यात येणार आहेत. सध्या जलसंधारण अधिकारी यांची ३१ कार्यालये असून, सुधारित आकृती बंधात राज्यातील ३४ जिल्ह्यांसाठी ३४ कार्यालये स्थापन करण्यात येतील. वर्धा, पालघर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये नव्याने जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची कार्यालये सुरु होतील. महानगरपालिका क्षेत्रामध्ये मृद व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात करावी लागतात. यासाठी मुंबई महानगर प्रदेशातील नऊ मनपांसाठी तीन पथके (९ पदे), पुणे व पिंपरी चिंचवड २ मनपासाठी १ पथक (३ पदे), नाशिक व मालेगाव मनपासाठी १ पथक (३ पदे), उर्वरित १६ महानगरपालिकांमध्ये वरिष्ठ अभियंता किंवा सहायक अभियंता श्रेणी (प्रत्येकी १ पद) अशी १६ पदे. अशारितीने २९ महापालिकांसाठी ३१ पदे नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.

मृद व जलसंधारण विभागांतर्गत जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे यंत्रणेमध्ये जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांची ३० कार्यालये आहेत, त्यांची संख्या चारने वाढविण्यात येणार असून, कोल्हापूर, लातूर, रत्नागिरी व रायगड या चार जिल्ह्यांमध्ये नव्याने कार्यकारी अभियंता (जि.प. लघु पाटबंधारे) कार्यालये स्थापन करण्यात येणार असून, त्यासाठी ४०८ पदांना मान्यता देण्यात आली आहे.

उप अभियंता यांची सध्या १४२ उप विभागीय कार्यालये आहेत. नव्याने ३३ कार्यालये सुरु करण्यात येणार आहेत. प्रत्येक उपविभागांतर्गत ८ पथके निर्माण करण्यात येतील. यानुसार १७५ उप विभागांसाठी ८ पथके अशी एकूण १४०० पथके निर्माण करण्यात येतील. राज्यात सध्या १५४३ मेगा वॉटरशेड असून, त्यांची विभागणी ५७ हजार ८४२ मायक्रो वॉटरशेडमध्ये करण्यात आली आहे. यामध्ये एका मायक्रो वॉटरशेडमध्ये आठशे ते नऊशे हेक्टरचा समावेश असतो. त्यामुळे सरासरी ४० मायक्रो वॉटरशेडसाठी १ पथक काम करेल.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळासाठी मंजूर दोन पदांव्यतिरिक्त वाढीव १९ पदांना अशा एकूण २१ पदांना मान्यता देण्यात आली आहे. मंत्रालयातील अधिक्षक अभियंता तथा पदसिद्ध उपसचिव हे पद रद्द करून, त्याऐवजी उप अभियंता संवर्गातील ३ वाढीव पदे मंजूर करण्यात आली आहेत तसेच विभागाकरिता प्रतिनियुक्तीने विधि अधिकारी यांचे एक व वाहनचालकाचे एक पद अशा १२ पदांचा समावेश करण्यात आला आहे.

०००

पुणे महानगरपालिकेला मुळा-मुठा नदीच्या पुनरूज्जीवन प्रकल्पासाठी विनामूल्य जमीन

पुणे नदी पुनरूज्जीवन प्रकल्पांतर्गत मुळा-मुठा नदीचा विकास करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस तीन शासकीय जमिनी विनामूल्य देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे पुणे महानगरपालिकेसाठी ११६ कोटी ६३ लाख ८२ हजार ३८६ रुपयांची कब्जेहक्काची रक्कम माफ होणार आहे.

पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत मुळा-मुठा नदीचा विकास करण्यासाठी संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल या दरम्यानच्या बाधित होणाऱ्या पुणे पेठ संगमवाडी (भूखंड क्रमांक ८१,८५,८६ आणि ९०) येथील नदी पात्रात असलेली ११०१५ चौरस मीटर मळई जमीन, मुंढव्यातील बोटॅनिकल गार्डनची सर्व्हे क्रमांक ८८ येथील ३४१२८.१६१ चौरस मीटर आणि मुंढव्यातीलच महिला व बाल सुधार गृहाची ७७०८.४९७ चौरस मीटर जमीन पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित करावी असा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी पाठविला होता. त्यानुसार ही सर्व जमीन पुणे महापालिकेस महसूल मुक्त आणि भोगवटामूल्यरहित प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली. या जमिनीचा वापर मंजूर केलेल्या कामासाठीच करावा लागणार आहे.

०००

संत्रा आयात शुल्क परतावा योजना रद्द करण्याचा निर्णय

महाराष्ट्रातून बांग्लादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्याकरिता बांग्लादेशातील आयात शुल्काच्या ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून देणारी योजना रद्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

बांग्लादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्याकरिता आयात शुल्कावर ५० टक्के अनुदान देण्यात येत होते. या योजनेला शेतकऱ्यांकडून फारसा प्रतिसाद लाभला नाही. तसेच विविध संस्था, संघटना यांच्याकडून योजना बंद करण्याबाबत निवेदने देण्यात आली होती. त्यावर हा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ न देणाऱ्या योजनांऐवजी थेट फायदा होईल, निर्यातक्षम पायाभूत सुविधा मजबूत होतील आणि बाजारपेठ विस्ताराला चालना मिळेल अशा परिणामकारक उपाययोजनांवर शासन अधिक लक्ष केंद्रित करणार आहे.

०००

वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत

राज्यातील नोंदणीकृत वैद्यकीय संस्थाच्या इमारतींना विकास शुल्कात ५० टक्के सवलत देण्यासाठी संबंधित महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यापूर्वी अशा संस्थांना २५ टक्क्यांची सवलत मिळत असे.

राज्यातील नागरिकांना सुलभ तसेच परवडणाऱ्या दरात व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय सेवा संस्थांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. या संस्था वैद्यकीय क्षेत्रात चांगल्या पायाभूत सुविधा व आरोग्य सेवा प्रकल्प राबवित असतात. यामध्ये रुग्णालये, दवाखाने व मॅटर्निटी होम यांची बांधकामे जलद गतीने झाल्यास, त्याचा गरजू रुग्णांनाही लाभ मिळणार आहे. या दृष्टीने या संस्थांच्या बांधकामांना विकास शुल्कात सवलत देण्याचा प्रस्ताव होता. त्यानुसार या विकास शुल्कात ५० टक्के सवलत देण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्यामधील संबंधित कलमात तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

०००

अनुसूचित जमाती आयोगासाठी उपाध्यक्षपदाची निर्मिती

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगामध्ये उपाध्यक्ष हे पद नव्याने निर्माण करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यासाठी १७ जुलै २०२५ रोजी अधिनियम प्रसिध्द करण्यात आला. हा अधिनियम ११ मे २०२६ रोजी अंमलात आला आहे. मात्र आयोगाच्या कार्य़प्रणालीत प्रभावी समन्वय आणि प्रशासकीय सोयीसाठी उपाध्यक्ष पद निर्माण करण्यात येत असून. त्याबाबतची तरतूद अधिनियमात करण्यात येणार असून, त्यासाठी अध्यक्षानंतर, उपाध्यक्ष पदाचा उल्लेख समाविष्ट करण्यात येणार आहे. उपाध्यक्ष हे सदस्यांमधूनच नामनिर्देशित केले जातील, अशी देखील अधिनियमात सुधारणा करण्यात येणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

०००

अनुसूचित जाती आयोगासाठी उपाध्यक्षपदाची निर्मिती

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगात उपाध्यक्ष नियुक्त करण्याच्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग स्थापन करण्यासाठी १० जून २०२५ रोजीच्य़ा बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार १७ जुलै २०२५ रोजी अधिनियम प्रसिध्द करण्यात आला. हा अधिनियम १२ सप्टेंबर २०२५ रोजी अंमलात आला आहे. मात्र आयोगाच्या रचनेनुसार सदस्यांतील एका सदस्यास उपाध्यक्ष म्हणून काम करता येईल, अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार संबंधित महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ (सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

०००

# १ जुलैपासून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य

## नियमभंग केल्यास १ हजार रुपयांचा दंड –परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्याबरोबरच वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना १ जुलै २०२६ पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) प्लेट बसविणे अनिवार्य केले आहे. यासाठी यापूर्वी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र राज्यातील उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) बसविण्याच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी आता ही मुदत ३० जून २०२६



पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जुन्या वाहनांनाही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत एचएसआरपी बसवून घ्यावी.

वाहन मालकांनी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन बसविण्यासाठी आगाऊ वेळ निश्चित करावी. संबंधित वाहनधारकांनी ३० जून २०२६ पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, ज्या वाहनधारकांनी मुदतीत एचएसआरपी बसवून घेतले नाही किंवा अपॉइंटमेंट नोंदवली नाही, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर विशेष तपासणी मोहीम राबवून पडताळणी करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल तसेच १ हजार रुपयांपर्यंत तडजोड शुल्क आकारण्यात येईल.

वाहनधारकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच एचएसआरपी साठी नोंदणी करावी आणि कोणत्याही अनधिकृत व्यक्ती अथवा एजंटच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहनही परिवहन मंत्र्यांनी केले आहे.

## संक्षिप्त...

### नवी मुंबईत 'युनिप्रिंट मीडिया सोल्युशन'चे दिमाखात उद्घाटन



**नवी मुंबई / के. एच. हनवते :** (सानपाडा) तरुण पिढीने केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योजक बनून स्वावलंबी व्हावे, या उद्देशाने नवी मुंबई सेक्टर ११ सानपाडा 'युनिप्रिंट मीडिया सोल्युशन' या नवीन ग्राफिक डिझाइन आणि प्रिंटिंग व्यवसायाचा शुभारंभ करण्यात आला, नवी मुंबईच्या महापौर सौ. सुजाताई सुरज पाटील यांच्या शुभ हस्ते आणि ज्येष्ठ पत्रकार व बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. तरुणांचा पुढाकार कु. सागर पारवे, कु. प्रथमेश सहाणे, कु. अभिषेक साळुंखे आणि कु. शुभम निगडे या चार सुशिक्षित तरुणांनी एकत्र येऊन या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली आहे. ग्राफिक डिझाइनिंगच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण कल्पना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याचा मानस या तरुणांनी व्यक्त केला आहे मान्यवरांचे मार्गदर्शन उद्घाटनप्रसंगी बोलताना सौ. सुजाताई पाटील यांनी या तरुणांच्या जिद्दीचे कौतुक केले. ''आजच्या काळात कौशल्य आधारित व्यवसायाला मोठी संधी आहे, चार मित्रांनी एकत्र येऊन सुरू केलेला हा प्रकल्प नक्कीच यशस्वी होईल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच कल्याणराव हनवते यांनीही या नवउद्योजकांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, उपलब्ध सेवा युनिप्रिंट मीडिया सोल्युशनच्या माध्यमातून सोशल मीडिया पोस्ट डिझाइन, लोगो मेकिंग, ब्रँडिंग आणि सर्व प्रकारच्या प्रिंटिंग सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उद्घाटन सोहळ्याला परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, मित्रपरिवार आणि मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी या युवा टीमच्या धाडसाचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात एसएससी परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार ; ९० % निकाल



**लातूर/प्रतिनिधी :** वसवाडी येथील भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोमवार, दिनांक ११ मे २०२६ रोजी सोहळा संपन्न झाला. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, प्रमुख पाहुणे म्हणून साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे सचिव कालिदास माने, संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, प्रशासकीय अधिकारी नागोराव कांबळे व उषा आडे, ज्ञानदेवराव माने ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शरद चव्हाण, आयआयटी फाउंडेशनच्या प्राचार्या उषा देशमुख, मुख्याध्यापक सिद्धेश्वर जाधव आदी उपस्थित होते.

या सत्कार सोहळ्यात विद्यालयातून सर्व प्रथम माळी सृष्टी नवनाथ, द्वितीय उबाळे प्रज्ञा कमलाकर व तृतीय आलेल्या खुडे अनुष्का संतोष यांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. सोबत शिंदे वैष्णवी भिमाशंकर, इटकर नागेश दत्ता, . जाधव श्रद्धा हरिभाऊ, सहजराव इशानी दत्ता,इडेकर अंकिता अशोक, भडंगे ऋतुजा नवनाथ आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा सुद्धा संस्थेचे सचिव मा. कालिदासराव माने सर यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक ढाले ए.जी., सुर्यवंशी एस. बी. प्रा. पंचशिला कांबळे, सेवक पांचाळ सुर्यकांत आदींनी मेहनत घेतली.कार्याक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. कल्याण पवार यांनी केले तर आभार उषा देशमुख यांनी मानले.

या यशाबद्दल साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत, साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे, सुभाष चंद्र बोस प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापक भागवत सगरे, अक्षनंद प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्मिता भोसले, नंदादीप प्राथमिक विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुवर्णा जोशी, भैरवनाथ प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक कमलाकर जाधव आदींनी अभिनंदन केले आहे.

### इंधन बचतीसाठी मंत्री नितेश राणेंचा मंत्रालयापर्यंत पायी प्रवास

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक इंधन संकटाच्या पार्श्वभूम ीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या 'काटकसरी'च्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुलेटवरून विधानभवन गाठल्यानंतर, त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आणि मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी चक्क पायी प्रवास करत मंत्रालय गाठले. 'सुवर्णगड' या आपल्या शासकीय निवासस्थानापासून ते मंत्रालयापर्यंतचा प्रवास त्यांनी चालत पूर्ण केल्याने सर्वांच्याच नजरा त्यांच्याकडे वळल्या होत्या.

या प्रवासादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना नितेश राणे म्हणाले की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन हे देशहितासाठी आहे. यात कोणतेही राजकारण न आणता इंधन बचतीसाठी सर्वांनीच पुढाकार घ्यायला हवा. मी माझ्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली असून, यापुढे केवळ सुरक्षेच्या कारणास्तव आवश्यक असलेल्या दोनच गाड्या माझ्या ताफ्यात असतील.''

## हिंगोलीत साकारणार भव्य 'कामगार भवन'

### राज्य शासनाकडून १४.१२ कोटींच्या खर्चास प्रशासकीय मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना सर्व शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी हिंगोली जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी भव्य 'कामगार भवन' उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी १४ कोटी १२ लाख ३५ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय १३ मे रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार, हे भवन मौजे हिंगोली येथील सर्वे क्र. ६० आणि ६३ मधील एकूण ३३ आर (३३०० चौ.मी.) जागेवर उभारले जाणार आहे. इमारतीमध्ये पार्किंग मजल्यासह तळमजला, पहिला मजला आणि दुसऱ्या मजल्याचे नियोजन आहे. इमारतीचे एकूण बांधकाम २११४.९८ चौ.मी. आहे.

या इमारतीत कामगार अधिकारी कार्यालय, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, घरेलू कामगार कल्याण मंडळ आणि माथाडी कामगार बोर्डाची कार्यालये स्थलांतरित केली जातील. इमारतीत फर्निचर, विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा प्रकल्प आणि दिव्यांगांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध असतील. सध्या हिंगोली येथील कामगार विभागाची कार्यालये खासगी भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. जागेच्या कमतरतेमुळे दैनंदिन कामात येणारे अडथळे दूर करण्यासाठी आणि शासनाचा भाड्यावर होणारा खर्च वाचवण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग तांत्रिक यंत्रणा म्हणून काम पाहणार असून, निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार आहे, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## नाशिक परिक्षेत्रात हायअलर्ट, राज्यात नाशिकसह चाळीस ठिकाणी एटीएसचे छापे

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने बुधवारी पहाटेपासून नाशिकसह राज्यात गोपनीय पद्धतीने मेगा कोम्बिंग ऑपरेशन राबवले आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण इनपुट्सनंतर नाशिक शहर, मालेगाव, जळगाव, पालघर, अकोला आणि अहिल्यानगरसह राज्यात तब्बल ४० हून अधिक ठिकाणी एटीएसने छापे टाकले आहेत. दरम्यान, जुन्या नाशिक भागातून एटीएसने दोघा संशयित तरुणांना ताब्यात घेतले असून, तिसरा संशयित पसार झाला आहे.

पाकिस्तानातील लाहोरचा कुख्यात गँगस्टर शहजाद भट्टी सध्या दुबईत आहे. आणि दुबईतूनच तो आपले रॅकेट चालवत असल्याचे समोर आले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तो भारतीय तरुणांना चिथावणी देत होता. त्यासोबतच देशविरोधी कारवायांसाठी भडकवत असल्याची माहिती एटीएसच्या हाती लागली आहे. धक्कादायक म्हणजे या सिंडिकेटमध्ये राज्यातील एकूण ५७ जणांची ओळख पटली आहे. तर त्यापैकी ४७ जणांची प्रत्यक्ष चौकशी केली जात आहे.

गँगस्टर शहजाद भट्टी याच्या सिंडिकेटशी संबंधित संशयास्पद संपर्कांवर महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने बुधवारी पहाटेपासून राज्यासह नाशिक परिक्षेत्रात म ेगा कोम्बिंग ऑपरेशन राबवले.

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण इनपुट्सनंतर नाशिक शहर, मालेगाव, जळगाव, पालघर, अकोला आणि अहिल्यानगरसह राज्यात तब्बल ४० हून अधिक ठिकाणी धाडी टाकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जुन्या नाशिक भागातून एटीएसने दोघा संशयित तरुणांना ताब्यात घेतले असून, तिसरा संशयित पसार झाला आहे. ताब्यात घेतलेल्यांना मुंबई एटीएसच्या स्वाधीन केले जाणार आहे. छापासत्रात लॅपटॉप, मोबाईल आणि अनेक महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. या कारवाईचे स्वरूप अत्यंत गोपनीय ठेवण्यात आले होते. नाशिक आणि मालेगावमधील काही तरुण भट्टीच्या सिंडिकेटशी डिजिटल माध्यम ातून जोडले गेल्याचा दाट संशय असल्याने या भागात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

शहजाद भट्टी हा मूळचा लाहोरचा असून गेल्या काही वर्षांपासून तो दुबईतून आपले गुन्हेगारी साम्राज्य चालवत आहे. त्याचे पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांशी थेट संबंध असून, भारतातील तरुणांना चिथावणी देऊन त्यांना बेकायदेशीर कृत्यांम ध्ये ओढणे हेच त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

### राजधानीत छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली, : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजधानीत त्यांना अभिवादन करण्यात आले. कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विशेष आयुक्त श्र्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहाय्यक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, व्यवस्थापक प्रमोद कोलापटे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलापटे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

### आयआयएचटी बरगढ / वेंकटगिरी येथे प्रथम सत्राकरिता प्रवेश सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील २०२६-२७ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहा सत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राकरिता महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडीशा) करीता १३+१ (या व्यतीरीक्त वेंकटगिरी करिता २ जागा कॉन्सुलिंगच्या घेणेबाबत नमूद आहे.) च्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्याकरीता प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर /सोलापूर/मुंबई/छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत विहीत नमुन्यात प्रवेश अर्ज १० जून २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत मागविण्यांत येत आहेत. त्याअनुषंगाने इच्छुक उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज दि. १०/०६/२०२६ पर्यंत संबंधीत प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग आयुक्तालयाकडे सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे http.www.dirtexmah.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे. असे वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांनी कळविले आहे.

## खरीप हंगामासाठी प्रशासनाने सज्ज राहावे; शेतकऱ्यांना खते-बियाणे वेळेत द्यावीत : पालकमंत्री नितेश राणे

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना खते, बियाणे आणि शेतीविषयक मार्गदर्शन वेळेत उपलब्ध होण्यासाठी सर्व यंत्रणांनी योग्य नियोजन करावे तसेच खरीप हंगामात कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयातील दालनातून दूरदृश्य प्रणालीद्वारे कणकवली, देवगड आणि वैभववाडी तालुक्यातील खरीप हंगाम २०२६ संदर्भातील आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, कृषी अधीक्षक तसेच संबंधित तीनही तालुक्यांतील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालक मंत्री राणे यांनी हवामान विभागाने एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली असल्याचा उल्लेख करत



शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करण्याचे आवाहन केले. कमी पावसाच्या परिस्थितीत घाईने पेरणी करू नये तसेच कृषी विभागाच्या सूचनांनुसारच पेरणी करावी, असे त्यांनी सांगितले.

खरीप हंगामाच्या पार्श्र्वभूमीवर कृषी विभागासह सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहण्याच्या सूचना देत शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते आणि कृषी औषधांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये याची विशेष काळजी घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात उपलब्ध असलेला खत व बियाण्यांचा साठा योग्य नियोजनाद्वारे प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात यावा, असेही ते म्हणाले. तसेच लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या समस्यांची गांभीर्याने दखल घेण्याच्या सूचना देत अवकाळी पावसामुळे फळबागांचे नुकसान झाल्यास तातडीने पंचनामे करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले.

पावसाचे प्रमाण, कृषी औषधांचा साठा, बियाण्यांची उपलब्धता, माती नमुने तपासणी तसेच खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचा सविस्तर आढावा यावेळी त्यांनी घेतला.

# खा.ओमराजे यांच्या पित्याच्या हत्या प्रकरणाचा निकाल लांबणीवर; १६ जूनला होणार जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षेत असलेल्या पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणातील निकाल पुन्हा पुढे ढकलण्यात आला आहे. म ुंबईतील विशेष सीबीआय न्यायालयानं बुधवारी अपेक्षित असलेला निकाल आज जाहीर केला नाही. न्यायालयानं या प्रकरणी पुढील सुनावणीसाठी १६ जून ही तारीख निश्चित केली आहे.

राज्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील ठरलेल्या पवनराजे निंबाळकर हत्याकांडातील खटल्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांचे वडील दिवंगत पवनराजे निंबाळकर



आणि त्यांचे चालक समद काझी यांची ३ जून २००६ रोजी कळंबोली येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेनं राज्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. पवनराजे निंबाळकर यांच्या वाढत्या राजकीय प्रभावामुळे त्यांची हत्या करण्याचा कट रचण्यात आल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला.


सीबीआयनं माजी मंत्र्यांवर हत्येचा ठेवला आरोप- या प्रकरणात महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री पद्मसिंह बाजीराव पाटील यांच्यासह एकूण नऊ जणांवर आरोप ठेवण्यात आले आहेत. अंतिम सुनावणीवेळी पद्मसिंह पाटील यांच्यासह सात आरोपी न्यायालयात उपस्थित होते. अतिरिक्त सत्र न्यायाधीश तथा विशेष सीबीआय न्यायाधीश एस. आर. नावंदर यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली आहे. सीबीआयच्या आरोपपत्रानुसार, पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येसाठी तब्बल २५ लाख रुपयांची सुपारी देण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरुवातीला स्थानिक पोलिसांकडे होता. त्यानंतर तपास सीआयडीकडे आणि पुढे सीबीआयकडे हत्या प्रकरणाचा तपास वर्ग करण्यात आला.

तब्बल १५ वर्षे न्यायालयीन प्रक्रिया - या खटल्यात समाजसेवक अण्णा हजारे यांच्यासह एकूण १२८ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. तसेच पारसमल जैन बादला हा या प्रकरणातील माफीचा साक्षीदार ठरला आहे. त्याचा जबाब खटल्यात महत्त्वाचा मानला जात आहे. विशेष म्हणजे, या खटल्याची नियमित सुनावणी ४ जुलै २०११ पासून सुरू होती. तब्बल १५ वर्षे न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहिल्यानंतर आता या प्रकरणाचा निकाल जूनमध्ये लागणार आहे. आरोपी पद्मसिंह पाटील यांच्या वतीनं सुमारे साडेबाराशे पानांचे लेखी म्हणणं न्यायालयात सादर करण्यात आलं होतं. राजकीय वतुर्ळासह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष आता या निकालाकडे लागलं असून विशेषत: धाराशिव जिल्ह्यात निकालाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

# ‘एल-निनो’मुळे उद्‌भवणारी संभाव्य परिस्थिती लक्षात घेवून खरीप हंगामासाठी आवश्यक सज्जता ठेवावी - पालकमंत्री भोसले

## जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक – बियाणे, खते वितरणात सुसूत्रता ठेवावी – पालकमंत्री





**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार २०२६ च्या मान्सूनवर एल-निनोचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामात उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक सज्जता ठेवावी. तसेच शेतकऱ्यांना पेरणी, बियाणे व खत वापर याविषयी योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.

खरीप हंगाम पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह पशुसंवर्धन विभाग, अग्रणी बँक, आत्मा, वन आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते यांचा पुरवठा सुरळीत होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्वच कृषि निविष्ठा केंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात बियाणे, रासायनिक खते उपलब्ध करून द्यावीत. कोणत्याही तालुक्यात तुटवडा निर्माण होवू नये, यासाठी निविष्ठा वितरणात सुसूत्रता ठेवावी, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी दिल्या. तसेच महाबीज बियाणे वितरणाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

‘एल-निनो’मुळे मॉन्सूनमध्ये अनिश्चितता राहणार असल्याने शेतकऱ्यांना पेरणी योग्य कालावधीबाबत सातत्याने मार्गदर्शन करावे, कोणत्या कालावधीत कोणत्या पिकाची पेरणी करणे योग्य राहील, याबाबत जनजागृती करावी. तसेच संभाव्य परिस्थितीत दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यासाठी पुरेसे बियाणे उपलब्ध होईल, यादृष्टीने सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते आणि पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन करावे. यासाठी कार्यशाळा, प्रशिक्षणाचे आयोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री. भोसले यांनी यावेळी दिल्या.

लातूर जिल्ह्यातील वृक्षांचे प्रमाण अतिशय कमी असल्याने जिल्ह्यात वृक्ष लागवडीवर भर देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना आहेत. त्यानुसार आगामी काळात जास्तीत जास्त वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करावेत. यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. यासोबतच जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कदम यांनी खरीप हंगाम पूर्वतयारीबाबत माहिती दिली. आगामी खरीप हंगामात ४ लाख ८५ हजार ५६४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणीचे नियोजन असून त्यासाठी ३ लाख ६४ हजार २४८ क्विंटल बियाणे लागणार आहे. यापैकी २ लाख ३६ हजार ७६१ क्विंटल बियाणे शेतकऱ्यांकडे उपलब्ध असून महाबीज, राष्ट्रीय बीज निगम आणि खासगी कंपन्यांचे एकूण १ लाख २७ हजार ४८७ क्विंटल बियाणे उपलब्ध होणार आहे. रासायनिक खतांच्या सरासरी वापरानुसार यंदा १ लाख ४५ हजार मेट्रिक टन खताची आवश्यकता भासेल असा अंदाज आहे. त्यानुसार महिनानिहाय पुरेसे खतसाठा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. बोगस बियाणे, खत विक्री रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. ‘एल-निनो’ मुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत पीक नियोजनाबाबत कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार पर्यायी पीक पद्धती, योग्य वाण निवड, राखीव बियाणे साठा यासंदर्भात व्यापक जनजागृती करण्यात येत असल्याचे श्री. कदम यांनी सांगितले.

आमदार श्री. काळे, खासदार डॉ. काळगे, आमदार श्री. कराड यांनीही यावेळी अनुषंगिक सूचना दिल्या.

# इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मिळणार शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके : सुरवसे



**लातूर/प्रतिनिधी** : समग्र शिक्षा,जिल्हा परिषद,लातूर अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरित करणाऱ्या वाहनाच्या वाहनाला हिरवा झेंडा दाखवून वाहतुकीचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती,शिक्षण समिती,जिल्हा परिषद,लातूर मा. श्री दयानंद सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती तृप्ती अंधारे या उपस्थित होत्या.

सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या २,०४,९०३,सेमी माध्यमाच्या १८२ व उर्दू माध्यमाच्या २६,३३१ अशा एकूण २३१४१६ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक शाळेच्या पहिल्या दिवशी वितरित करण्यात येणार आहेत त्यासाठी बालभारती,विभागीय मंडळ, लातूर येथून सदर पुस्तके तालुकास्तरावर व तालुका स्तरावरून ते शाळा स्तरावर वितरित करण्याची नियोजित आहे.

पाठ्यपुस्तक तालुकानिहाय वाटप पुढीलप्रमाणे होणार आहे. लातूर-८१३०५,अहमदपूर-२६३०२, औसा- २७३६९,निलंगा-३०७११,उदगीर- ३६८९५,चाकूर-१६३७४,रेणपुर-१०१८०,देवणी-७६३५,जळकोट-८५१३ व शिरूर अ. -६१३२

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार यावर्षी इयत्ता दुसरी,तिसरी,चौथी व सहावी या वर्गाचा अभ्यासक्रम बदलल्यामुळे नवीन अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके हे विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.

सदरील कार्यक्रमास बालभारती, विभागीय मंडळाचे श्री.सचिन आलडवाड, भांडार व्यवस्थापक लातूर, श्रीकिशोर जाधव, सहाय्यक निर्मिती अधिकारी, श्री दिपक कुंभार, भांडार अधीक्षक तसेच श्री दिपक गलांडे, रवी औसेकर, चेतन वाल्मिकी,श्री चौळे उपस्थित होते. तसेच पाठ्यपुस्तक वाटपाचे नियोजन समग्र शिक्षा अभियान या कार्यालयामार्फत करण्यात येत असून त्या कार्यालयाचे श्री. सतीश भापकर, रउफ शेख, श्री.चंद्रकांत ठाकरे श्री.दत्तात्रय माळकर, श्री.सुनील राजुरे, श्री.गोविंद भोळे, श्री.योगिराज आमगे इत्यादी अधिकारी कर्मचारी सदर उपक्रमाचे नियोजन करत आहेत.

# स्त्रियांच्या बोलीचा अभ्यास म्हणजे त्यांच्या अंतर्मनाचा शोध – डॉ. सांगोले




**लातूर/प्रतिनिधी** : बोलीच्या समाजभाषावैज्ञानिक अभ्यासातून हाती येणारे निष्कर्ष हे केवळ भाषिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे दर्शन घडवणारे असतात,असे प्रतिपादन प्रसिद्ध अभ्यासक डॉ. सुनीता सांगोले यांनी केले. महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था (मुंबई) आणि मराठी भाषा विद्यापीठ (रिद्धपूर, अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे ११ ते १३ मे दरम्यान आयोजित बोली अभ्यासक कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

मराठीच्या बोलींचा भाषाशास्त्रीय अभ्यास या सत्रात डॉ. सुनीता सांगोले यांनी स्त्रियांच्या बोलीवर विशेष भाष्य केले. त्या म्हणाल्या की, स्त्रियांच्या भाषेतील सूक्ष्म पदर शोधण्यासाठी संशोधकांनी शास्त्रीय दृष्टी ठेवणे आवश्यक आहे. बोलीचे नमुने संकलन, विश्लेषण आणि निष्कर्ष हे टप्पे कसे पार पाडावेत, याचे विवेचन त्यांनी यावेळी केले. सहभागी निरीक्षण ही पद्धत अचूक माहिती संकलित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते, असेही त्यांनी नमूद केले. स्त्रियांच्या बोलीत समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधनाची सामाजिक उपयोगिता किंवा या संशोधनाचे महत्त्व विषद करताना डॉ. सांगोले यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले.ग्रामीण भागातील मुलींना शिकवताना त्यांच्या बोलीचा विचार करून अध्यापन पद्धती ठरवणे सुलभ होते. लेखक आणि नाटककारांना स्त्री-पात्रांचे संवाद अधिक जिवंत आणि वास्तववादी लिहिण्यासाठी या संशोधनाची मदत होते.

समाजातील स्त्री-पुरुष सत्तासंबंध आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचे दर्शन या अभ्यासातून घडते. तसेच स्त्रियांच्या बोलीतून त्यांची सामाजिक स्थिती-गती समजते, ज्याचा उपयोग शासनाला ध्येयधोरणे ठरवण्यासाठी होतो. यावर लक्ष वेधले.

या सत्रात डॉ. सोनल कुलकर्णी यांनी बोली अभ्यास बृहतप्रकल्प राबवताना आलेले अनुभव कथन केले आणि संशोधन पद्धतीवर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. फुला बागूल यांनीही बोली अभ्यासाच्या शास्त्रीय पद्धतीवर आपले विचार मांडले.

या कार्यशाळेस महाराष्ट्रातील नामवंत बोली अभ्यासक, संशोधक, साहित्यिक, कलाकार आणि शब्दकोशकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. बोली भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी दिशा देणाऱ्या या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी अभ्यासकांनी महाराष्ट्र शासनाचे व आयोजकांचे आभार मानले.

## मच्छिमारांना साधनांच्या खरेदीसाठी ७५ टक्क्यांपर्यंत शासकीय अनुदान

**लातूर/प्रतिनिधी** : मच्छिमारीसाठी लागणाऱ्या साधनांच्या किमतीत दिवसेंदिवस मोठी वाढ होत असल्याने, गरीब मच्छिमारांना आपला व्यवसाय किफायतशीरपणे करता यावा, या उद्देशाने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सहकारी संस्थांच्या सभासदांना आणि वैयक्तिक क्रियाशील मच्छिमारांना मासेमारी साधनांच्या खरेदीवर अनुदान दिले जाणार असून, लातूर येथील मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी यासाठी इच्छुक लाभार्थ्यांकडून प्रस्ताव मागविले आहेत.या योजनेमध्ये तयार मासेमारी जाळीसाठी २४ हजार रुपये प्रकल्प किंमत निश्चित करण्यात आली असून, ३० किलो जाळीसाठी अर्थसहाय्य दिले जाईल. तसेच नौका खरेदीसाठी लाकडी नौकेकरिता ६० हजार, स्टील नौकेसाठी ३० हजार, तर फायबर नौकेसाठी १ लाख २० हजार रुपयांची प्रकल्प मर्यादा ठरवण्यात आली असून, यामध्ये राखीव प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के आणि अराखीव प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के शासकीय अनुदान दिले जाणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचा सभासद किंवा वैयक्तिक क्रियाशील मच्छिमार असणे आवश्यक आहे. लाभार्थ्याने विहित नमुन्यातील अर्जासोबत प्रकल्प अहवाल, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, छायाचित्र, बँकेचे विवरणपत्र आणि खरेदीची जीएसटी पावती सादर करणे अनिवार्य आहे. जर लाभार्थी बँक कर्जाद्वारे किंवा स्वनिधीतून योजनेचा लाभ घेणार असेल, तर संबंधित बँकेचे शिफारसपत्र जोडणे आवश्यक आहे. कुटुंबातील इतर कोणत्याही व्यक्तीने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असल्यास संबंधित लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल, असे मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे. तरी पात्र मच्छिमारांनी लवकरात लवकर आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विलासराव देशमुख शासकीय वैयकीय महाविद्यालयात जागतिक परिचारिका दिन साधेपणाने साजरा

**लातूर/प्रतिनिधी** : १२ मे हा दिवस परिचर्या व्यवसायाची जननी आद्य परिचारिका मिस फ्लोरेंस नाइटींगेल यांच्या जन्म दिनानिमित्त जागतिक परिचारिका दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही विलासराव देशमुख शासकीय वैयकीय महाविद्यालयात हा दिवस महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, शाखा लातूर -संचलित उत्सव समितीच्या वतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त योजित कार्यक्रमात सकाळी ८ वाजता मा. विभाग प्रमुख डॉ मेघराज चावडा, शल्य चिकित्सा विभाग, मा. अधिसेविका, श्रीमती लक्ष्मीबाई आपटे वि.दे. शा. वै. म व रु. लातूर, मा. अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे अतिविशेषोपचार रुग्णालय लातूर, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, लातूर शाखेच्या अध्यक्ष, श्रीमती छाया चव्हाण, उत्सव समिती अध्यक्ष श्रीमती किरण निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन व शपथ ग्रहण सोहळा पार पडला. मा. अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे व श्रीमती लक्ष्मीबाई आपटे यांनी उपस्थित परिचारिकांना रुग्णसेवेची शपथ दिली.

तद्नंतर परिचरिकांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.







यात परिचारिका संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले. यावेळी अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तर अधिसेविका श्रीमती लक्ष्मीबाई आपटे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्तविक महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, मुख्यालय लातूर शासन मान्य संघटनेच्या राज्यसरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे यांनी केले. यावर्षी नुकतेच शासनाने परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्याची कार्यवाही शासनाने सुरू केली असल्याने अनेक परिचारिका तणावात आहेत व परिचारिका संवर्ग हा ९० % महिला कर्मचारी असलेला संवर्ग असून त्या तिन्ही पाळ्यामध्ये सकाळ/दुपार/रात्रपाळी रुग्णसेवा देतात. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन आधीच विस्कळीत झालेले असते. त्यात कुटुंबामध्ये आई वडील सासू-सासरे हे सुद्धा त्यांच्यावर अवलंबून असून त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या या महिलावर आहेत, प्रशासकीय बदली मुळे त्यांचे कौटुंबिक स्वास्थ बिघडते त्याचबरोबर परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या दर ३ वर्षानी कक्षांतर्गत बदली होत असतात. त्यांच्यावर कसलाही आर्थिक कार्यभारांचा प्रभार नाही. यामुळे राज्यातील परिचारिकांना प्रशासकीय बदली धोरणातून वगळून केवळ विनंती व तक्रार आधारित बदल्या कराव्यात या मागणी साठी आझाद मैदान मुंबई येथे दि १८, १९, २० रोजी संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन केले जाणार असल्याने, होऊ घातलेल्या प्रशासकीय बदली च्या सावटाखाली परिचारिका तणावात असल्याने हा कार्यक्रम साधेपणाने करत असल्याचे श्रीमती तोटे यांनी सांगितले.

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी संघटनेचे राज्यकार्यकारिणी सदस्य पांडूरंग गव्हाणे, उपाध्यक्ष श्री संजीव लहाने, सचिव भाग्यश्री जोगदड, खजिनदार श्रीमती रंजना भताने, सहसचिव भगवान केंद्रे, उत्सव समिती उपाध्यक्ष श्रीमती मीना दैवज्ञ, श्रीमती ज्योती भारती, शिला कांबळे चंद्रशेखर जाधव सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले. शेवटी अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण यांनी आभार व्यक्त केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.